आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
९ नोव्हेंबर २०२५ - रविवार

**ठळक बातम्या**

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची अंगोलाच्या राष्ट्राध्यक्षांबरोबर महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा
- नवोन्मेष हा केवळ बुद्धिमत्ता आणि संशोधनाचा उत्सव नसून लोकांचं जगणं वेगळ्या पातळीवर नेण्याचा मार्ग असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन
- पुण्यातल्या कोरेगाव पार्क आणि बोपोडी जमीन व्यवहार प्रकरणांचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे
- बिहार विधानसभा निवडणुकीचा प्रचार आज संपणार

**आणि**

- आयसीस दहशतवादी संघटनेशी संबंधित ३ संशयितांना गुजरातमधे अटक

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू दोन आफ्रिकी राष्ट्रांच्या दौऱ्यावर असून काल रात्री त्या अंगोलाची राजधानी लुआंडा इथ पोहचल्या. अंगोलाचे अध्यक्ष जोआओ मॅनुअल गोंजाल्विस लौरेंको यांच्याबरोबर आज राष्ट्रपती मुर्मू द्विपक्षीय चर्चा करणार असून , त्यानंतर दोन्ही देशांदरम्यान विविध करारांवर स्वाक्षरी होईल. आपल्या दौऱ्यात राष्ट्रपती मुर्मू अंगोला राष्ट्र स्थापनेच्या सुवर्ण महोत्सवी वर्धापन दिनाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. तसंच तिथल्या संसदेला संबोधित करणार आहेत. अंगोलातल्या भारतीय समुदायाशीही राष्ट्रपती संवाद साधतील.

या वर्षाच्या सुरुवातीला भारताने अंगोलाच्या संरक्षण क्षेत्राच्या आधुनिकीकरणसाठी २०० दशलक्ष डॉलर्सची मदत जाहीर केली होती.

सध्या दोन्ही देश या करारावर चर्चा करत आहेत. अंगोला हा आफ्रिकेतला भारताचा दुसऱ्या क्रमांकाचा तेल आणि ऊर्जा पुरवठादार आहे. तिथे नवीन तेलसाठे सापडल्यामुळे भारत अंगोलाला तेल शुद्धीकरण आणि शोध कामांमध्ये मदत करू शकतो. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात ११ ते १३ नोव्हेंबर या कालावधीत बोत्सवाना मधे जाणार आहेत.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या मंगळवार पासून दोन दिवसांच्या भूतान दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्यादरम्यान, मोदी आणि भूतानचे राजे जिग्मे खेसर नामग्याल वांगचुक, एक हजार वीस मेगावॅट क्षमतेच्या पुनात्सांगचु-२ या जलविद्युत प्रकल्पाचं उद्घाटन करतील. भारत आणि भूतान यांनी संयुक्तपणे हा प्रकल्प विकसित केला आहे. भूतानचे राजे जिग्मे सिंग्ये वांगचुक यांच्या ७० व्या जयंतीनिमित्त आयोजित समारंभात प्रधानमंत्री सहभागी होतील आणि भूतानचे प्रधानमंत्री त्शेरिंग तोबगे यांचीही भेट घेतील.

यावेळी जागतिक शांती प्रार्थना महोत्सवात प्रधानमंत्री मोदी सहभागी होणार असून थिंपूमधील ताशिचोडझोंग इथं भगवान बुद्धांच्या पवित्र अवशेषांच्या स्थळी प्रार्थना करणार आहेत.

<><><><><>

उत्तराखंड राज्याचा आज २५ वा स्थापना दिवस आहे. स्थापना दिनानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत देहरादून इथं विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात प्रधानमंत्री मोदी विशेष टपाल तिकीटाचं प्रकाशन, उत्तराखंडमधल्या आठ हजार कोटी रुपयांच्या विकास कामांचं भूमीपूजन आणि उद्घघाटन केलं. तसंच प्रधानमंत्री पीकविमा योजनेतून २८ हजारांपेक्षा जास्त शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ६२ हजार कोटी रुपये हस्तांतरित केले. गेल्या २५ वर्षात उत्तराखंडचं चित्र पूर्णपणे पालटलं असून विविध क्षेत्रातल्या उत्तराखंडच्या यशोगाथा इतरांना प्रेरित करतात असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यावेळी केलं. उत्तराखंडने पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य, ग्रामीण विकास यात भरीव कामगिरी केली आहे. राज्यात दोन लाख कोटी रुपये खर्चाच्या विकासकामांवर काम सुरू आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले.

<><><><><>

नवोन्मेष हा केवळ बुद्धिमत्ता आणि संशोधनाचा उत्सव नसून लोकांचं जगणं वेगळ्या पातळीवर नेण्याचा मार्ग असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. मुंबईत श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठातल्या इनोव्हेशन महाकुंभाचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. नवनवीन कल्पना आणि नवीन संशोधनाला उद्योजकतेमधे रुपांतरित करण्यासाठी राज्यसरकारने विशेष स्टार्ट अप धोरण जाहीर केलं असून

स्टार्टअप्सना प्रोत्साहन देण्याकरता विशेष निधी उभारला आहे असं ते म्हणाले. राज्याचे कौशल्यविकास मंत्री मंगलप्रभात लोढा कार्यक्रमाला उपस्थित होते.

**<><><><><>**

पुण्यातल्या कोरेगाव पार्क आणि बोपोडी जमीन व्यवहार प्रकरणांचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपवण्यात आला आहे. या व्यवहारातली कुलमुखत्यारपत्रधारक शीतल तेजवानी परदेशात पळून गेल्याची चर्चा असली तरी त्याला पोलिसांनी दुजोरा दिलेला नाही. या प्रकरणांतली कागदपत्रं संबंधित शासकीय विभागाकडून मागवण्यात आली आहेत. त्याची पडताळणी करून पुढील कारवाई करण्यात येणार आहे, असं सूत्रांनी सांगितलं.

**<><><><><>**

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात, अद्ययावत संगणकीकरणासाठी महत्वपुर्ण ठरणाऱ्या, क्वांटम संगणक प्रणालीसाठी आवश्यक ‘क्यू- बीट्स’ विकसित करण्यात पुणे इथल्या आयसर- भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्थेतल्या शास्त्रज्ञांना यश आलं आहे. औषधनिर्माण, संरक्षण, हवामान, वित्तीय प्रणाली, अवकाश आदी क्षेत्रातील अत्यंत जटिल आणि प्रगत संशोधनासाठी सुरक्षित आणि सक्षम पर्याय म्हणून ‘क्वांटम कॉम्प्युटिंग’कडे पाहिलं जातं. जगात सध्या अमेरिका, युरोप, रशिया आणि चीनमध्ये यावर संशोधन सुरु असताना भारतानं या क्षेत्रात ही महत्वपूर्ण कामगिरी केली ही विशेष बाब असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटले आहे.

**<><><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्याच्या प्रचाराचा आज शेवटचा दिवस आहे. त्यामुळे रालोआ आणि महाआघाडीचे प्रमुख नेते आपल्या भाषणांमधून मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करत आहेत. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**- - होल्ड व्हीसी - -**

*(बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यानंतर दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्याचा प्रचारही जोरदार झाला. सर्व पक्षांचे नेते आणि स्टार प्रचारकांनी मतदारांना आपली बाजू पटवून देण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला. यात दोन्ही बाजूंनी आरोप प्रत्यारोपही झाले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, काँग्रेसचे वरिष्ठ नेते राहुल गांधी*

*यांच्यासह संयुक्त जनता दलाचे अध्यक्ष नितीशकुमार आणि राजद नेते तेजस्वी यादव यांनी अनेक प्रचारसभा घेऊन मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला. आजही ठिकठिकाणी सर्व प्रमुख नेत्यांच्या प्रचारसभा होणार आहेत.*

*संयुक्त जनता दलाचे अध्यक्ष आणि मुख्यमंत्री नितीशकुमार आज औरंगाबाद, गया आणि कैमुर जिल्ह्यात अनेक सभांना संबोधित करणार आहेत. भाजपाचे वरिष्ठ नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा सासाराम आणि अरवल इथं सभा घेतील. तसंच वरिष्ठ नेते आणि संरक्षण मंत्री राजनाथ सिंह औरंगाबाद आणि कैमूर इथं प्रचारसभांना संबोधित करणार आहेत. काँग्रेस नेते राहुल गांधी पुर्णिया आणि किशनगंज इथं महाआघाडीच्या उमेदवारांसाठी प्रचारसभा घेणार आहेत. राजद नेते तेजस्वी यादव भभुआ, रोहतस आणि औरंगाबाद जिल्ह्यांमधे अकरा सभांना संबोधित करणार आहेत. तसंच जनसुराज्य पक्षाचे नेते प्रशांत किशोर यांच्यासह बसपा आणि एमआयएम चे नेतेही आपापल्या उमेदवारांसाठी प्रचारसभा घेणार आहेत.)*

दरम्यान, मतदानाच्या पहिल्या टप्प्यात व्हीव्हीपॅट पावत्या उघड्यावर आढळल्याप्रकरणी सहायक निवडणूक अधिकाऱ्याला निलंबित करण्यात आलं आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल झाला असून चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत.

दुसऱ्या टप्प्यात १२२ मतदारसंघासाठी ११ नोव्हेंबरला मतदान होणार आहे. १ हजार ३०२ उमेदवार रिंगणात उतरले असून तीन कोटी सत्तर लाख मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. १४ नोव्हेंबरला बिहार विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर होणार आहे.

**<><><><><>**

आयसीस या दहशतवादी संघटनेशी संबंध असल्याच्या संशयावरून, गुजरात मधल्या दहशतवाद विरोधी पथकानं गांधीनगरमध्ये अदलाज इथून आज ३ जणांना अटक केली, आणि त्यांच्याकडून शस्त्र जप्त केली. ते देशाच्या विविध भागात हल्ला करण्याचा कट रचत होते, असा आरोप आहे. या प्रकरणी पुढला तपास सुरु आहे.

**<><><><><>**

लातूर शहराजवळ नांदेडकडे जाणाऱ्या महामार्गावर आज सकाळी साडेअकराच्या आसपास सीएनजी वाहून नेणाऱ्या टँकरमध्ये गळती झाली. त्यामुळे दोन्ही बाजूंची वाहतूक

बंद करण्यात आली. टँकरमधली गळती थांबवण्यात अग्निशमन दलालाही अपयश आल्यानं टँकरमधला दाब कमी होईपर्यंत वाहतूक बंदच होती. त्यानंतर परिस्थिती सुरळीत झाली.

<><><><><>

विदर्भातली ग्रामीण संस्कृती, लोककला आणि झाडीपट्टीची संस्कृती जपणारा वार्षिक मंडई उत्सव यंदाही, भंडारा जिल्ह्यात उत्साहात सुरु आहे. दिवाळीच्या दुसऱ्या दिवसापासून मंडई उत्सवाला सुरुवात होत असते. गाव तसंच पंचक्रोशीतले नागरिक या पारंपरिक उत्सवात या वर्षीही सहभागी झाले. दंडार, तमाशा आणि खडीगंमत यांसारख्या पारंपरिक लोककला, तसंच तीन अंकी नाटक असे मनोरंजनासोबतच समाजप्रबोधनाचा संदेश देणारे सांस्कृतिक कार्यक्रम या वर्षीही सादर झाले.

<><><><><>

सर्बियाचा टेनिसपटू नोव्हाक जोकोविच यानं एटीपी २५० अथेन्स गटाचं विजेतेपद पटकावल्यानंतर तासाभरातच खांद्याच्या दुखापतीमुळे एटीपी अंतिम फेरीतून माघार घेतली आहे. हंगामातली ही शेवटची फेरी असून ती चुकण्याचं त्याचं हे सलग दुसरं वर्ष आहे.

<><><><><>

भारताचा राष्ट्रीय खेळ असलेल्या हॉकीला शंभर वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त यवतमाळ इथं आज सकाळी भव्य रॅलीचं आयोजन करण्यात आलं होतं. विद्यार्थांनी मोठ्या संख्येनं यात सहभाग नोंदवला.

<><><><><>

नशामुक्त भारताचा संदेश समाजात पोहोचवण्यासाठी गोंदिया इथं आज ‘रन फॉर हेल्थ’ मेरेथॉन स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं. “नशा मुक्त भारत - स्वस्थ भारत” असा नारा देत आरोग्यदायी आणि व्यसनमुक्त समाज घडविण्याचा संदेश यातून देण्यात आला.

<><><><><>

राज्यात बहुतांश भागात आता थंडी जाणवू लागली आहे. नाशिक, जळगाव शहरांत किमान तापमान १० ते १२ अंश सेल्सिअसपर्यंत खाली आलं आहे. तर अन्य काही शहरांमध्येही किमान तापमान २० अंशांच्या खाली आलं आहे. आज सर्वत्र हवामान कोरडं असेल, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

//<><><><><>//